प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO
WE MAKE CITIES
सिडको

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. 04.07.2018**

# सिडकोची जासई-उरण एमटीएचएल कास्टिंग यार्ड येथे अनधिकृत बांधकामविरोधी कारवाई

मा. उच्च न्यायालयाच्या सन 2012 च्या याचिका क्र. 138 वरील आदेशानुसार सिडको किंवा महाराष्ट्र शासनाकडून कोणताही विकास परवाना न घेता करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे आणि त्याबाबतचा अहवाल न्यायालयाला सादर करण्याचे निर्देश न्यायालयामार्फत देण्यात आले आहेत. त्यानुसार श्री. शिवराज एस. पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी, निवडश्रेणी-अनधिकृत बांधकाम विभाग) सिडको आणि अनधिकृत बांधकाम नियंत्रक (दक्षिण) यांच्या पथकाने **दि.29 जून 2018** रोजी **जासई-उरण एमटीएचएल (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक) कास्टिंग यार्ड, नवी मुंबई** येथे अनधिकृत बांधकामविरोधी कारवाईचे आयोजन केले होते. सदर कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे :

जासई-उरण येथील पॉकेट क्र. 6 मधील एमटीएचएल कास्टिंग यार्ड येथे अनधिकृतरित्या उभारण्यात आलेली गॅरेज, गोदामे, टपऱ्या, स्टॉल, भिंतीसह उभारण्यात आलेली पत्राशेड, दुकाने, कार्यालये आणि अन्य 30 बांधकामे निष्कासित करण्यात येऊन अंदाजे 05.93 हेक्टर इतके क्षेत्र मुक्त करण्यात आले.

सदर कारवाईवेळी श्री. पी. बी. माने, सहाय्यक अनधिकृत बांधकाम नियंत्रक, एमएमआरडीए हे ही त्यांच्या पथकासह उपस्थित होते.

उरण पोलीस स्थानकातील 90 पोलीस कर्माचाऱ्यांच्या सहकार्याने सदर कारवाई पार पाडण्यात आली. या कारवाईवेळी सिडकोतील सहाय्यक सुरक्षा अधिकारी यांसह सिडकोचे पोलीस पथक, एमएसएफ कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक हेही उपस्थित होते.

सदर कारवाई करतेवेळी 2 पोक्लेन आणि 6 जीप यांचा वापर करण्यात आला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको**